जा.क्र.-जिपऔ/शिक्षण/प्रा.वि.११/का.वि/२०२०/२८१७
कार्यालय जिल्हा परिषद औरंगाबाद.
दिनांक:- २८-१०-२०२०

# जाहिर प्रगटन

श्रीमती डी डी तुपकरी स शि हया के प्रा शा विहामांडवा ता पैठण येथे कार्यरत असतांना दिनांक १९/६/२०१५ पासुन रजेवर गेल्याबाबत मुख्याध्यापक के प्रा शा विहामांडवा यांनी कळविले असता या कार्यालयाचे पत्र दिनांक १/१/२०१६ व ५/२/२०१६ अन्वये कारणे दाखवा नोटिस देण्यात आली होती. संबंधिताने गट शिक्षणाधिकारी प स पैठण यांचेमार्फत दिनांक १५/२/२०१६ अन्वये खुलासा सादर केला. त्यामध्ये त्यांनी "माझ्या मुलीच्या शिक्षणासाठी व संगोपनासाठी शाळेवर उपस्थित राहु शकत नाही" असे नमुद करुन "मी लवकरात लवकर हजर होण्याचा प्रयत्न करेल" असे लेखी दिले.

संबंधिताने रजेवर जाण्यापुर्वी सक्षम प्राधिकाऱ्याची पुर्व परवानगी घेतलेली नसल्याने व संबधित हया शाळेवर हजरही होत नसल्याने संबंधिताविरुध्द विभागीय चौकशी सुरु करण्यासाठी गट शिक्षणाधिकारी प स पैठण यांचेकडुन १६/४/२०१६ अन्वये दोषारोप पत्र मागविण्यात आले असता गट शिक्षणाधिकारी प स पैठण यांनी दिनांक १२/८/२०१६ च्या पत्रान्वये दोषारोप पत्र सादर केले. त्यानुसार संबंधिताविरुध्द विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आली. विभागीय चौकशीची ज्ञापन नोटिस दोषारोप पत्रासह संबंधितास दिनांक १४/६/२०१७ अन्वये पोस्टाने तामिल केले. संबंधिताने सदर ज्ञापन नोटिसीचा खुलासा दिनांक ९/४/२०१८ अन्वये सादर केला. त्यामध्ये मुलगी लहान असल्याने तिच्या सांभाळ करणे आवश्यक होते त्यासाठी रजा घेणे गरजेचे होते असे नमुद करुन दिनांक १६/२/२०१८ रोजी त्यांची प्रसुती झाल्याने व बाळ खुपच लहान असल्याकारणाने उपस्थित होऊ शकत नसल्याबाबत खुलाश्यात नमुद केले आहे. संबंधिताचा खुलासा समाधानकारक नसल्याने संबंधिताविरुध्द विभागीय चौकशी सुरु करण्यासाठी दिनांक २८/७/२०१८ च्या आदेशान्वये सहाय्यक आयुक्त (चौकशी) यांची नियुक्ती करण्यात आली.

त्यानुसार सहाय्यक आयुक्त (चौकशी) यांनी दिनांक १६/१/२०१९ अन्वये चौकशी अहवाल सादर केला. सदर अहवालामध्ये संबंधितावर ठेवण्यात आलेले सर्व दोषारोप सिध्द झाल्याचे नमुद असुन संबंधित हया विभागीय चौकशीला देखील उपस्थित नसल्याचे चौकशी अहवालामध्ये नमुद आहे. तेव्हा प्राप्त चौकशी अहवालाच्या अनुषंगाने संबंधितास या कार्यालयाची अंतिम कारणे दाखवा नोटिस दिनांक ४/७/२०१९ अन्वये सेवेतुन बडतर्फ का करण्यात येऊ नये? याबाबत खुलासा मागविण्यात आला होता. सदर नोटिसीचा खुलासा संबंधिताने आजपर्यंत सादर केलेला नाही व हजरही झालेल्या नाहीत.

त्याअनुषंगाने गट शिक्षणाधिकारी प स पैठण यांनी दिनांक २/८/२०१९ रोजी संबंधित राहत असलेल्या औरंगाबाद येथील राहत्या घरी भेट दिली असता घरास कुलुप असल्याचे दिसुन आल्याने शेजाऱ्यास विचारणा केली असता त्या पाच महिन्यांपासुन वास्तव्यास नसल्याचे सांगितले. त्यानुसार केंद्रीय मुख्याध्यापक यांनी संबंधिताच्या राहत्या घराच्या दरवाजावर अंतिम कारणे दाखवा नोटिस डकवुन त्याबाबत पंचनामा केला असल्याबाबत कळविले असुन सोबत पंचनाम्याची प्रत सोबत सादर केली. परंतु, तरीदेखील संबंधिताने खुलासा सादर केला नाही अथवा हजर झाल्या नाहीत.

श्रीमती तुपकरी स शि यांच्या मुळ सेवा पुस्तिकेमधील "स्वग्राम" ची नोंद असलेल्या ठिकाणी संबंधिताची माहिती मिळते का? ते तपासावे, यापुर्वी ६(२) ची नोटिस ज्या पत्यावर तामिल केली तेथुन माहिती घ्यावी, कुटुंबातील इतर सदस्य नातेवाईक असतील तर त्यांचेकडुन माहिती घ्यावी, तसेच संबधिताचा E-Mail उपलब्ध असल्यास तसेच whatsapp असल्यास त्याद्वारे संपर्क साधण्याचा प्रयत्न करावा संबंधितास नोटिस तामिल झाल्याबाबत खात्री करुन अहवाल सादर करण्याबाबत गट शिक्षणाधिकारी प स पैठण यांना कळविले. त्यानुसार गट शिक्षणाधिकारी प स पैठण दिनांक १४/९/२०२० अहवाल सादर केला आहे. सदर अहवालामध्ये मुख्याध्यापक के प्रा शा विहवामांडवा यांचा दिनांक १४/९/२०२० च्या पत्राची प्रत सादर केली असुन त्यामध्ये मुख्याध्यापक यांनी संबंधिताचा पत्ता व व्हाट्सअप नंबर मिळण्यास दोन-तीन महिन्यांचा कालावधी लागल्याचे नमुद करुन त्यानंतर मुख्याध्यापक के प्रा शा विहामांडवा यांनी त्यांच्या स्वत:च्या भ्रमणध्वनी वरुन दिनांक १९/११/२०१९ व २१/१२/२०१९ रोजी संबंधिताच्या भ्रमणध्वनीवर नोटिस तामिल केल्याचे व संबंधिताने सदर नोटिस पाहिल्याचे दिसुन आले असल्याबाबत नमुद केले आहे. त्यानंतर पुन्हा दिनांक १३/९/२०२० व १४/९/२०२० रोजी नोटिस तामिल केल्याबाबत अहवाल सादर केला आहे.

यावरुन संबंधितास मुख्याध्यापक के प्रा शा विहामांडवा यांनी व्हाट्सअपवर नोटिस तामिल केलेली असतांना संबंधिताने सदर नोटिसीचा खुलासा सादर केलेला नसल्याचे दिसुन येते.

सबब, संबंधित हया दिनांक १९/६/२०१५ पासुन आजपर्यंत अनाधिकृत गैरहजर असल्याने व वारंवार संधी देऊनही हजर न झाल्याने संबंधितास सेवेतुन बडतर्फ करण्यापुर्वी शेवटची एक संधी देण्यात येत असुन संबंधिताने सदर प्रगटन जाहिर झाल्यापासुन १० दिवसांच्या आत गट शिक्षणाधिकारी प स पैठण यांचेमार्फत शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जि प औरंगाबाद यांचेकडे हजर व्हावे नसता संबंधिताविरुध्द सेवेतुन बडतर्फ करण्याचे आदेश निर्गमित करण्यात येतील, याची गांभिर्याने नोंद घ्यावी.

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद औरंगाबाद